टंचाई निवारणार्थ विविध उपाययोजना

विंधण विहिर कार्यक्रम

अपर्नात उचित

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु १००३/ प्र.क्र ९६ /पा.पु.०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मे,२००३**

**वाचा : शासन अधिसूचना पा.पु. व स्व. वि. क्रं.ग्रापापु १०००/प्रक्र १०७(१) / पापु - ०७ दिनांक १४.११.२०००**

**प्रस्तावनाः**

राज्यात सध्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. टंचाई निवारणार्थ विविध उपाययोजना घेण्यात आलेल्या आहेत. या उपाययोजनांपैकी **विंधण विहिरी** उपाययोजना सध्या जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या टंचाई आराखडयानुसार आवश्यक विंधण विहिरी त्वरित खणून त्यावर हातपंप बसवून त्यातून त्वरित पाणी पुरवठा उपलब्ध होणे अपेक्षित आहे. तथापि, काही जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागातील यंत्रणा व जिल्हाधिकारी यांच्यात समन्वय होण्यात कांही अडचणी निर्माण होत आहेत असे शासनाचे निदर्शनास आले आहे. परिणामतः, काही जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्यात अडचणी उद्‌भवलेल्या आहेत.

२. विंधण विहिरींच्या टंचाईच्या कामासाठी स्त्रोत निश्चित करण्यासाठी शासन क्षेत्रातील भू.स.वि.यं.च्या जिल्हा स्तरावरील वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांच्या कार्यालयातील भू-वैज्ञानिकांच्या तसेच जिल्हा परिषदेतील भू-वैज्ञानिकांच्या सेवा वापरण्यात येत आहेत. परंतु ही कामे दोन वेगवेगळया यंत्रणांमार्फत होत असल्याने काही ठिकाणी या कामाचा योग्य समन्वय होत नाही असे दिसते. यास्तव, टंचाई अंतर्गत विंधण विहिरी खोदण्याच्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांच्या मागदर्शनानुसार अशा अडचणी उद्‌भवलेल्या आणि कमी प्रगती झालेल्या जिल्हयांमध्ये जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याकडे देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ च्या कलम-२६१ (२) (क) अन्वये जळगांव, बीड, नांदेड व बुलढाणा या जिल्हयातील जिल्हा परिषदांच्या पाणी पुरवठा विभागातील उप अभियंता(यांत्रिकी), भू-वैज्ञानिक संवर्गातील अधिकारी व संबंधीत कर्मचाऱ्यांच्या सेवा टंचाई कालावधीकरीता टंचाई अंतर्गत घ्यावयाच्या विंधण विहिरी कार्यक्रमासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात येत असून जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने व त्यांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व कार्यक्रमाचे मंजूर कृती आराखडयाप्रमाणे **संचालन, संनियंत्रण व समन्वय** करण्याचे संपूर्ण अधिकार व जबाबदारी जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिकांना देण्यात येत आहे.

२. तसेच जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे अधिनस्थ असलेला कर्मचारी वर्गही टंचाईच्या कामाकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन राहील व त्यांचे संचालन, संनियंत्रण व समन्वयसुध्दा जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचेकडेच राहील.

३. जिल्हा परिषदेतील संबंधीत अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा वर नमूद केलेल्या कामासाठी जरी जिल्हाधिकारी यांचे अधीनस्त वरीष्ठ भू-वैज्ञानिक यांचे संनियंत्रणाखाली ठेवण्यात आल्या असल्या तरी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ च्या कलम २६१ (२) (ख) अन्वये ते जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर कायम आहेत असे समजण्यात येऊन त्यांचे वेतन व सर्व भत्ते जिल्हा परिषदांना शासनाकडून यासाठी देण्यात आलेल्या अनुदानातून अदा करण्यात यावेत.

४. वरील आदेशाचे काटेकोर पालन करण्यात यावे

५. हे आदेश दिनांक ३० जून २००३ पर्यत अंमलात राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव

C:\My Documents\vidhan Vihir.doc

मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त, नाशिक, औरंगाबाद व अमरावती
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी, जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
उप अभियंता(यांत्रिकी) ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद,
जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जळगांव, बीड, नांदेड, बुलढाणा
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती, कार्यासन क्रमांक पा.पु.०७